6 FEB. 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# गुणात्मक दर्जा सुधारणे आवश्यक

## प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांचे प्रतिपादन : सायबर कॉलेजमध्ये प्राचार्यांसाठी कार्यशाळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिक्षण क्षेत्रात जगाच्या तुलनेत भारत व्दितीय क्रमांकावर आहे. त्यामुळे भारताने संख्यात्मक विकासापेक्षा गुणात्मक दर्जा सुधारला तर भारत जगाचे शैक्षणिक नेतृत्व करेल, असे प्रतिपादन प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांनी केले.

सायबर कॉलेजमधील जिल्ह्यातील सर्व कॉलेजच्या प्राचार्यांसाठी आयोजित 'संस्था विशेष सदगुण संपन्न करणे" या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक डॉ. ए. ए. अली होते.



कोल्हापूर : सायबर कॉलेजमधील प्राचार्यांसाठीच्या कार्यशाळेचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे. सोबत डॉ. व्ही. एम. हिलगे, डॉ. ए. ए. अली, डॉ. व्ही. एस. आपटे आदी.

डॉ. मोरे म्हणाले, १८५७ मध्ये भारतात ३ विद्यापीठ आणि २७ कॉलेज होते. १९४७ साली २७ विद्यापीठ आणि ६०० महाविद्यालय होती. सध्या ४५० विद्यापीठ आणि जवळपास ४३ हजार महाविद्यालये आहेत. पण गुणवत्तेत वाढ करण्यात आपण कमी पडत आहोत. त्यामुळे गुणवत्ता वाढीकडे लक्ष देण्याची गरज आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून शिक्षणाचा गुणात्मक दर्जा सुधारला तरच २०२० मध्ये अब्दुल कलाम यांच्या स्वप्नातील भारत साकारण्यास मदत होईल. जे देश जास्तीत जास्त तंत्रज्ञानाचा वापर करतील तेच देश सर्वच क्षेत्रात जागतिक पातळीवर तग धरून राहतील. सायबर कॉलेजला नॅकचे 'ए प्लस" मानांकन मिळाले आहे. त्यामुळे सायबर कॉलेज प्रशासनाने या कार्यशाळेचे उत्कृष्ट नियोजन केले आहे.

दुसऱ्या सत्रात संस्थेचे संचालक डॉ. ए. ए. अली यांनी नॅक मूल्यांकनासाठी कसे उत्कृष्ट सादरीकरण करावे याची माहिती प्रात्यक्षिकाव्दारे दिली. दिवसभरात दुसऱ्या व तिसऱ्या सत्रात "नॅक"चा एसएसआर कसा तयार करायचा. यामध्ये अभ्यासक्रम, संशोधन, प्राथमिक सोयी–सुविधा, नेतृत्व, विद्यार्थी केंद्रीत सुविधा आदींचा दर्जा कसा वाढवला पाहिजे, आदी विषयावर डॉ. टी. व्ही. जी. शर्मा, डॉ. यू. एम. देशमुख, प्रोफेसर आर. टी. थोरात, डॉ. सी. एस. काळे, मान्यवरांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेचा समारोप कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते झाला.

यावेळी विश्वस्त डॉ. व्ही. एम. हिलगे, कार्यशाळेच्या संयोजक डॉ. व्ही. एस. आपटे, डॉ. ए. जी. जाधव, डॉ. पी. बी. पाटील, गडहिंग्लज घाळी कॉलेजचे प्राचार्य डॉ. एम. आर. पाटील, प्राचार्य डॉ. वाय. जी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. पी. वाय निंबाळकर, प्राचार्य डॉ. जे. बी. पिष्टे, प्राचार्य डॉ. डी. व्ही. पाटील, प्राचार्य डी. जी. नेजकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
-6 FEB 2017
लोकमत

# शिक्षणात गुणात्मक वाढ करण्याची गरज

कोल्हापूर : गेल्या काही वर्षांत शिक्षण क्षेत्रामध्ये संख्यात्मक वाढ झाली आहे. शिक्षणात संख्यात्मक वाढीपेक्षा गुणात्मक वाढ होण्याची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु डॉ. डी आर. मोरे यांनी केले. छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस एज्युकेशन अँड रिसर्च (सायबर)तर्फे विविध महाविद्यालयांतील प्राचार्यांसाठी 'अचीव्हिंग इन्स्टिट्यूशनल एक्सलन्स' वरील एकदिवसीय बैठकीच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. मोरे म्हणाले, विद्यार्थिकेंद्रित शिक्षणपद्धती आता अमलात आली आहे. शिक्षण क्षेत्रात अनेक आमूलाग्र बदल होत आहेत. हे बदल महाविद्यालयाने स्वीकारले पाहिजेत. 'नॅक'च्या माध्यमातून महाविद्यालयांची गुणवत्ता तपासली जाते.

पहिल्या सत्रामध्ये आय. क्यू. एस. सी. विभागाचे समन्वयक डॉ. टी. व्ही. शर्मा म्हणाले, नॅक मूल्यांकनाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे श्रेणीकरण कार्यपद्धती. यामध्ये संस्थेला अनेक कामांचे ऑडिट रिपोर्ट करावे लागतात. बऱ्याच महाविद्यालयांना हे अहवाल तयार करताना अनेक समस्या व अडचणींना सामोरे जावे लागते; कारण हे अहवाल तयार करण्याचे कोणतेही विहित आराखडे उपलब्ध नाहीत. 'सायबर'चे संचालक डॉ. एम. एम. अली यांनी 'संस्थेच्या मूल्यांकन-श्रेष्ठतेची गरज आणि संबंध' या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी नॅक मूल्यांकनासाठी उत्कृष्ट सादरीकरणही महत्त्वाचे आहे. (प्रतिनिधी)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 FEB 2017
पुण्यनगरी

# कौशल्य आत्मसात करण्याची गरज

## डॉ. डी. आर. मोरे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनात विविध कौशल्य आत्मसात करणे ही काळाची गरज आहे. इंग्रजी संभाषण कला व शिष्टाचार विद्यार्थ्यांनी आत्मसात केले पाहिजे, असे प्रतिपादन प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांनी केले.

विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभाग आणि विद्यापीठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने कौशल्य व रोजगार मेळावा घेण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी आणि प्रा. ए. एम. गुरव यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी १६ नामांकित कंपन्यांतर्फे ७६४ पदांकरिता भरती प्रक्रिया घेण्यात आली. यामध्ये १०३४ उमेदवारांनी सहभाग घेतला व एकूण २४१ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. ५० उमेदवारांनी समुपदेशन व कॅशलेस व्यवहार कसे करावेत याबाबत माहिती घेतली. लेटर रायटिंग, रिझ्युम रायटिंग, इंटर पर्सनल व कम्युनिकेशन स्कील या कौशल्यासंदर्भातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाचा लाभ.६६० उमेदवारांनी घेतला. स्वागत डॉ. एस. बी. सादळे यांनी केले. प्रास्ताविक विद्यापीठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्राचे सहायक संचालक सचिन जाधव यांनी केले. आभार प्रा. अमर डूम यांनी मानले.

6 FEB 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळा आता ऑनलाईन

## रजिस्ट्रेशनसह सर्टिफिकेटही ऑनलाईन मिळणार : पर्यावरणपूरक ऑनलाईन वर्कशॉप घेणारे राज्यातील पहिलेच विद्यापीठ ठरणार

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील ३८ अधिविभागांमध्ये इथून पुढे होणाऱ्या कार्यशाळांचे रजिस्ट्रेशन आता ऑनलाईन करता येणार आहे. पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये म्हणून उपस्थित संशोधक विद्यार्थी, प्राध्यापकांना ऑनलाईन सर्टिफिकेटही देण्याची सोय केली आहे. त्यामुळे प्राध्यापक, विद्यापीठाचा वेळ आणि पैसा वाचणार आहे. पर्यावरणपूरक ऑनलाईन वर्कशॉप घेणारे महाराष्ट्रातील पहिलेच विद्यापीठ म्हणून शिवाजी विद्यापीठाची जगभर ओळख होणार आहे.

एखादी कार्यशाळा, चर्चासत्र किंवा परिषदेमध्ये नावनोंदणी करावयाची असेल तर 'युनि शिवाजी' वेबसाईटवर गेले की वर्कशॉप म्हणून स्वतंत्र टॅब आहे. या टॅबवर क्लिक केल्यास विद्यापीठ अंतर्गत सर्व अधिविभागांतील कार्यशाळांची माहिती पहायला मिळते. संबंधित अधिविभागावर क्लिक केल्यास युजर आयडी व पासवर्ड स्वत: तयार केल्यानंतर कार्यशाळेचा अर्ज पाहता येतो. हा अर्ज भरून आपला फोटो व ऑनलाईन सही अपलोड करायची. कार्यशाळेच्या नोंदणी शुल्काची रक्कम नेटबँकींग किंवा डेबिट कार्डचा वापर करून 'पेमेंट गेट वे'च्या माध्यमातून भरणे कार्यशाळेत सहभागी होणाऱ्यांना शक्य होणार आहे. पैसे भरल्यानंतर लगेच जागेवर तुम्हाला पैसे भरल्याची पावती व विशिष्ट नंबर मिळतो. त्यानंतर कार्यशाळेसाठी नावनोंदणी झालेले फोटो असलेली आयडेंटेटीची प्रिंटआऊट मिळणार आहे. संबंधित विभागाचे कार्यशाळेचे निकष पूर्ण केल्यानंतर अधिविभागप्रमुखाच्या सहीने कार्यशाळेचे सर्टिफिकेट मिळणार आहे.



शिवाजी विद्यापीठांतर्गत ३८ अधिविभागांत जवळपास वर्षभरात ६० कार्यशाळा होतात. या कार्यशाळांच्या नोंदणीसाठी यापूर्वी इतर विद्यापीठ किंवा इतर राज्यांतील प्राध्यापक, विद्यार्थ्यांना डिमांड ड्राफ्ट भरावा लागत होता. डिमांड ड्राफ्ट काढण्यासाठी विद्यार्थी व प्राध्यापकांचे जवळपास ६० रुपयांचे नुकसान होत होते. ते थांबणार आहे. तसेच ऑनलाईनमुळे २४ तास वेबसाईटवर कार्यशाळेसाठी नावनोंदणी करता येणार आहे.

**एपीआयसाठी कार्यशाळांतील सहभाग उपयुक्त**

विद्यापीठांतर्गत कार्यशाळेसाठी फंडींग एजन्सी, युजीसी किंवा विद्यापीठ अनुदान देते. हे अनुदान संपवण्यासाठी वर्षभरात जवळपास एका विभागात एक ते दोन कार्यशाळा, परिषद किंवा चर्चासत्रे असतात. कार्यशाळेत २०० ते ३०० संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक सहभागी होतात. आपला एपीआय वाढवण्यासाठी पेपर वाचन व कार्यशाळांमध्ये सहभागी होतात. प्राध्यापक पदासाठी एखाद्या मुलाखतीला गेल्यावर चर्चासत्र, कार्यशाळांमधील सर्टिफिकेटसाठी १० गुण दिले जातात. हे गुण मिळवण्यासाठी प्राध्यापक जास्तीत जास्त कार्यशाळांमध्ये सहभागी होत असतात. संशोधक विद्यार्थ्यांना आपला एपीआय वाढवण्यासाठी ही ऑनलाईन रजिस्ट्रेशन फायदेशीर ठरणार आहे.

**एकत्रित दस्तऐवज तयार होणार**

त्या त्या विभागाच्या प्रमुखांचे डिजीटल सिग्नेचर क्यू आर कोड आहे. यावरून चुकून नावात बदल करण्याचा प्रयत्न केला तर खालील सही आपोआप नाहीशी होते. रजिस्ट्रेशनची २४ तास सेवा उपलब्ध आहे. आपण पाठवलेला पेपर स्वीकारला आहे का, रिसिट ऑनलाईन मिळाली आहे का? याची माहिती विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना मिळणार आहे. फंडिंग एजन्सी, सरकार व विद्यापीठ यांच्या अनुदानातून सर्वसाधारण ५५ ते ६० वर्कशॉप होतात, याचा एकत्रित दस्तऐवज तयार होणार आहे.

– **अजित चौगुले (वित्त व लेखाधिकारी)**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 FEB 2017
महाराष्ट्र टाईम्स

## रोजगार मेळाव्यात २४१ उमेदवारांची निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभाग व विद्यापीठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती मार्गदर्शन केंद्राच्यावतीने घेण्यात आलेल्या रोजगार मेळाव्यात २४१ उमेदवारांची प्राथमिक निवड झाली आहे. सोळा कंपन्यांच्यावतीने ७६४ पदाकरिता मेळावा घेण्यात आला. यामध्ये सुमारे एक हजार विद्यार्थी सहभागी झाले होते. उद्घाटन प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांच्या हस्ते झाले. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी, प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी मनोगत व्यक्त केले. रोजगार मेळाव्यात १६ नामवंत कंपन्या सहभागी झाल्या होत्या. एकूण ७६४ जागांसाठी एक हजार ३४ उमेदवार उपस्थित होते. त्यापैकी २४१ उमेदवारांची प्राथमिक निवड केली आहे. प्रा. अमर डूम यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 FEB 2017

लोकमत

# विद्यापीठात महिला लैंगिक छळ संरक्षण कार्यशाळा

**कोल्हापूर :** महिलांचा लैंगिक छळ संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम-२०१३ या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील महाविद्यालयांच्या अंतर्गत महिला तक्रार निवारण समितीच्या प्रत्येकी तीन सदस्यांसाठी शिवाजी विद्यापीठ व राज्य महिला आयोग यांच्यावतीने मंगळवारी (दि. ७) एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांनी शनिवारी झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

या परिषदेसाठी विद्यापीठ परिक्षेत्रातील २८२ महाविद्यालयांतील सुमारे ७५० हून प्रतिनिधी हजर राहतील. ही कार्यशाळा तीन सत्रात होणार आहे. पहिल्या सत्रात कार्यशाळेचे उद्घाटन महिला आयोगाच्या अध्यक्षा रहाटकर यांच्या हस्ते होणार आहे, तर पुढच्या दोन सत्रात आयोगाचे उपसचिव विशाल केडिया हे मार्गदर्शन करणार आहेत. (प्रतिनिधी)

6 FEB 2017
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
तरुण भारत

# अध्ययन, अध्यापन क्षेत्रात संगणकाची भूमिका महत्त्वाची

वार्ताहर
कोतोली

अध्ययन, अध्यापन क्षेत्रात संगणकाची भूमिका महत्वाची आहे असे प्रतिपादन विद्यापीठातील संगणक विभागाचे प्रा. प्रसन्न करमरकर यांनी केले.

माळवाडी कोतोली (ता. पन्हाळा) येथील श्रीपतराव चौगुले महाविद्यालय येथे शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत 'अध्ययन व अध्यापनयामध्ये आधुनिक साहित्याचा वापर' या विषयावर कार्यशाळेप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जे. के. पवार होते. आधुनिक जग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे, या युगामध्ये विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञान आत्मसात करणे काळाची गरज आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी जागतिक घडामोडी लवकर समजण्यास मदत होईल. असेही त्यांनी यावेळी सांगितले. संगणकाच्या वापरामुळे अध्ययन व अध्यापन प्रक्रिया पेनलेस व पेपरलेसच्या दिशेने जात आहे; शिवाजी विद्यापीठाचा पेपरलेसचा मानस भावी काळात यशस्वी होईल असे प्रा. परशुराम वडार यांनी सांगितले. अधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मातृभाषणून झाल्यास ती लोकांना सहज समजेल व त्याचा वापर करणे शक्य होईल असे प्राचार्य डॉ. जे. के. पवार यांनी "अध्यक्षस्थानावरून बोलताना म्हणाले.

**प्रा. प्रसन्न करमरकर यांचे प्रतिपादन**

प्रास्ताविक समन्वय प्रा. पी. डी. माने, सूत्रसंचालन प्रा. सौ. बी. एस. शिंदे तर आभार प्रा. मनीषा पाटील यांनी मानले. यावेळी प्रशासन अधिकारी प्रवीण आंबेरकर, प्रा. मोळे, यांचेसह प्राध्यापक उपस्थित होते.

6 FEB 2017

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

साहित्य संस्कृती

# 'स्पार्क'मधून उलगडला कलागुणांचा आविष्कार

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या फिल्म मेकिंगच्या गुणांनी वाव मिळवा आणि त्यामधून विविध दर्जेदार कलाकृती निर्माण व्हावी या उद्देशाने शिवाजी विद्यापीठाच्या जर्नलिझम आणि मास कम्युनिकेशन विभागाच्यावतीने 'स्पार्क शॉर्ट फिल्म फेस्टिवल' झाला. जर्नलिझम आणि मास कम्युनिकेशन आणि जयसिंगपूरच्या होप फाऊंडेशनच्यावतीने शिवाजी विद्यापीठाच्या नीलांबरी हॉलमध्ये झालेल्या फेस्टिव्हलमध्ये विभागाचे विद्यार्थी शैलेश कोरे यांची 'पाचशेची बॅग' या लघुपटचा प्रीमीअर शोसह तीन लघुपट आणि चार महितीपटांच्या स्क्रीनिंगला चांगला प्रतिसाद मिळाला.

विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी स्पार्क फेस्टिव्हलमागचा उद्देश स्पष्ट केला. सायबर कॉलेजचे प्राध्यापक डॉ. राजेंद्र पारिजात, जयसिंगपूरच्या टीव्ही-व्हीडिओ महाविद्यालयाचे प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

'पाचशेची बॅग' लघुपटाची कथा, पटकथा सुशांत पाटील यांची असून दिग्दर्शक, कॅमेरा, संकलन शैलेश कोरे यांनी केले असून सहायक संकलन, सहायक कॅमेरामन म्हणून सूरज बुरांडे, मिलिंद कांबळे यांनी काम केले आहे. होप फाऊंडेशन आणि शैलेश कोरे मोशन पिक्चर निर्मित या लघुपटमध्ये वडील आणि मुलगा यांच्यातील नाते, पोटाला चिमटा काढत मुलाच्या शिक्षणासाठी कष्ट करणारे वडील, मुलाची स्कूलबॅगसाठी मागणी, ती पूर्ण करण्यासाठी वडिलांची धडपड याचे चित्रण अगदी योग्य पद्धतीने केले आहे. वडिलांच्या भूमिकेमध्ये खंडू चव्हाण आणि बाल कलाकर सुमित सुतार यांचे अभिनय बोलके वाटतात. आभास आणि वास्तव यांचे दर्शन लघुपटामधून होते. शैलेश कोरे यांच्या दिग्दर्शनाचे कौशल्य कौतुकास्पद आहे.








'जाणीव' लघुपटाची कथा, पटकथा, कॅमेरा, दिग्दर्शन मल्हार जोशी यांनी केले असून कला दिग्दर्शन अक्षय कुलकर्णी, संकेत शेंडगे, प्रीतम पंडित यांचे आहे. पार्श्वनिवेदन श्रीराम मोहिते यांनी केले आहे. जाणीव या लघुपटामध्ये एखाद्या अंध व्यक्तीच्या चित्राची कल्पना कशी असू शकते हे अधोरेखित केले आहे. लघुपटाच्या सुरवातीला वडील आणि मुलाच्या संवादापासून ते शेवटी चित्राची संकल्पना समजून घेताना चित्रकार वडिलांसमोर स्वतः काढलेल्या चित्राच्या माध्यमातून स्वतःच्या चित्राची संकल्पना मांडतो. आणि मुलगा अंध असल्याचे दर्शकांना अखेरीस कळते. दृष्टी असलेली व्यक्ति आणि दृष्टिहीन व्यक्ती यात फार मोठा फरक नाही, फक्त जाणीव असणे महत्वाचे हे यामधून स्पष्ट होते. लघुपटचा शेवट मुलाच्या चेहऱ्यावरुन ओसांडणाऱ्या आनंदाने होतो.

'तुमची दृष्टी बदलून टाकेल, त्यांची सृष्टी, त्यांच्या जाणिवेत एकरूप व्हा' हा संदेश मनावर खोल परिणाम करणारा ठरतो.

'धनगरवाडी' या माहितीपटाचे लेखन, दिग्दर्शन परशराम पवार यांनी केले असून संकलन संतोष चव्हाण यांचे आहे. कॅमेरा अभिजीत जाधव यांचे आहे. धनगरवाडी महितीपट चंदगड, आजरा, गडहिंग्लज या भागातील धनगरवाड्यांच्या समस्यांवर प्रकाशझोत टाकतो. देश सध्या कॅशलेस इकॉनॉमी, डिजिटलाझेशन, याकडे वाटचाल करत आहे. पण देशचा भाग असलेले धनगरवाडे सुरक्षा आणि मुलभूत सोयींपासून वंचित आहेत. उत्कृष्ट छायाचित्रण आणि दिग्दर्शन याचे उदाहरण मानून या महितीपटाकडे आपल्याला पाहता येईल.

'हिस्टॉरिकल मलकापूर' या माहितीपटाची कथा, पटकथा, कॅमेरा, दिग्दर्शन, संकलन अजिंक्य देसाई यांनी केले आहे. पार्श्वनिवेदन श्रीराम मोहिते यांचे असून यातून मलकापूर शहराची एक वेगळी ऐतिहासिक सांस्कृतिक परंपरा मांडली आहे. शहराचे इतिहास वाचन, संस्कृती, पुरातन वास्तू, गडकिल्ल्यांचा वारसा, लोकपरंपरा यांचा वेध महितीपटातून घेतला आहे.

बदलत जाणारी शहराची रचना याचेही उत्तम चित्रण महितीपटातून होते. तर 'आक्रंदन' माहितीपटाची कथा, पटकथा, कॅमेरा, दिग्दर्शन, संकलन संतोष चव्हाण यांचे आहे. याचे पार्श्वसंगीत चंदू कागले यांचे असून गीतकार विठ्ठल वाघ यांची गीते यात आहेत. यात अजय खाडे, संयोगिता पाटील, एन. डी. चौगुले यांच्या भूमिका आहेत. 'आक्रंदन' या कथात्मक महितीपटात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न मांडण्यात आला आहे. वास्तववादी शैलीतील या महितीपटातून दृश्यात्मकतेचा प्रभावी वापर केला गेला आहे.

'स्वतंत्र - स्वातंत्र्य' या माहितीपटाची कथा, पटकथा सुयोग घाटगे यांची असून कॅमेरा, दिग्दर्शन शाहबाज पटवेगार यांनी केले आहे. संकलन सूरज यादव यांनी केले असून यात दूर्वा दळवी या सूत्रधार आहेत. 'स्वतंत्र स्वातंत्र्य' या महितीपटामधून भारतात स्वातंत्र्याची संकल्पना वेगवेगळ्या व्यक्तींसाठी काय आहे याचा वेध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. स्वातंत्र्याचा खरा अर्थ आजही अनेक लोकांपर्यंत पोहोचलेला नाही. स्वातंत्र्याच्या बरोबर येणारी कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या यांचेही भान सजग नागरिकाने बाळगणे गरजेचे आहे हे या महितीपटामधून प्रभावीपणे मांडले आहे. तर 'टर्निंग पॉइंट' या लघुपटाची कथा, भूमिका, दिग्दर्शन संकेत शेंडगे यांचे आहे. कॅमेरा शाहबाज पटवेगार तर संकलन सूरज यादव यांचे आहे. टर्निंग पॉइंट लघुपटामध्ये करिअरच्या प्रचंड स्पर्धेमध्ये वावरणाऱ्या तरुणाला स्वतःची स्वप्ने पूर्ण करताना कुटुंब, समाजाच्या दबावतून वाट काढावी लागते याचे चित्रण उत्तमप्रकरे केले आहे. संवादरहित मांडणीतून केवळ दृश्यांमधून हा लघुपट उलगडत जातो, हे याचे वैशिष्ट्य आहे. स्पार्क शॉर्टफिल्म फेस्टिव्हलला विद्यार्थ्यांचा उत्साही प्रतिसाद मिळाल्याचे सर्वांचा मास कम्युनिकेशन विभागाच्या डॉ. सुमेधा साळुंखे- घाटगे यांनी सांगितले.